**सं.फौ.ख.क्र. ५११/२०१५**
शासन वि. शेख
**निशाणी क्र. ०९**

*अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा पुरावा*

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की —

**माझे नांव** : **शेख आसिफ अब्दुल हमीद शेख,**
**वय** : **४३ वर्षे, धंदा : पान दुकान**
**राहणार** : **रा. सोनारआळी शिरूर ता. शिरूर जि. पुणे**

**सरतपासणी: अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कदम :**

**१.** सन २०१४ मध्ये माझे साई पान दुकान होते व ते आजही सुरू आहे. हे मला माहिती नाही की साई स्नॅक्स आणि टि सेंटर नावाचे हॉटेल कुठे आहे. अल्पवयीन मुलगा सलीम शेख बाबत मला कांही माहिती नाही.

**(सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहाय्य करित नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपासात विचारण्यात येणारे उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सदर परवानगी देण्यात आली.)**

**उलटतपासणी: अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कदम:**

**२.** दि ०५.०२.२०१४ राजी पोलीसांनी माझा जबाब नोंदविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अल्पवयीन मुलगा सलीम शेखला पोलीसांनी माझे ताब्यात दिले होते व मी त्या मुलाला त्यांचे भावाचा शोध घेवुन त्यांचे ताब्यात दिले होते. माझे जबाबातील अधोरेखांकित भाग अ हा मजकुर मी पोलीसांना सांगीतला नव्हता. परंतु तसे माझे जबाबात का लिहिले हे मला सांगता येत नाही.

**३.** आरोपी हा माझा भाउ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत व्हावी म्हणुन मी खोटी सांगत आहे.

**उलटतपास: आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. एस.पी.शिंदे**

**४.** नाकारला

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2026.07.28 16:59:46 +0530

ठिकाण : शिरूर.
दिनांक : २८/०७/२०२६.

**(संजय दि. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे.